# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतनाच्या बाजुला, उस्मानपुरा
औरंगाबाद - ४३१ ००५, पत्र पेटी क्र -५१६
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**::तात्काळ/कालमर्यादित::** **जा.क्र.विकाऔ/आस्था-१/२०१९/** 906

::परिपत्रक:: **दिनांक :-** 15 JAN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.

**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,

औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर

**उपसचिव**,महराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

**विषय**:-नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्याबाबत- सन-२०१९ ...
**महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशासकीय सेवा गट-अ व गट-ब या संवर्गातील साधारण बदल्या-२०१९**

**संदर्भ**:-मा.संचालक,तंत्रशिक्षण,महा.राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/नियमित अध्यापकांच्या बदल्या/२०१९/३०,दि.१४/०१/२०१९.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,शासकीय सेवकांच्या नियतकालिकबदल्याबाबत संदर्भांन अधिनियमान्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार दि.३१ मे,२०१९ रोजी एकाच पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदावर किंवा एका पेक्षा जास्त पदांवर एकाच ठिकाणी ३ वर्ष सेवा पूर्ण करणारे **गट-अ व गट-ब मधील पदावर कार्यरत अध्यापक/अधिकारी यांचे नाव** आद्याक्षरात न लिहिता पूर्ण नाव नमूद करुन माहिती सोबतच्या विहित प्रपत्र अ,ब,क मध्ये खालील सूचना विचारात घेऊन सादर करावी.

०१.प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन ठिकाणे कळवावीत.ज्या अधिकारी/अध्यापकांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत किंवा तीन पेक्षा कमी ठिकाणे नमूद केलीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने त्या शिवाय अन्यत्र करण्यात येईल,याची जाणीव करुन द्यावी.

०२.ज्या अधिकारी व अध्यापकांची त्यांचे जवळचे नातेवाईकांचे आजारपण व त्यांचे स्वतःचे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा अधिकारी/अध्यापकांनी विंनती बदली अर्जासोबत पर्याप्त वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक असून केवळ एका प्रमाणपत्राचे आधारे विनंती बदली विचारात घेतली जाणार नाही. तसेच ज्या अधिकारी/अध्यापकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले आहेत,अशा अधिकारी/अध्यापकांची माहिती व त्यांचे विनंती बदली अर्ज सहपत्रासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्यात यावेत.पुर्वी विनंती बदलीकरीता अर्ज केलेला असला तरी त्यांनी पुन्हा सोबतच्या प्रपत्रात माहिती सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विनंती बदलीसाठी अर्ज प्राचार्य/विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावेत. संचालनालयास थेट अर्ज सादर करण्यात येऊ नये. तसेच संचालनालयास थेट अर्ज सादर केल्यास किंवा प्रस्तावाच्या विहित मुदतीनंतर स्वतंत्रपणे प्राप्त झालेला अर्ज विचारात न घेता सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील असे आपल्या स्तरावरुन संबंधितांना कळविण्यात यावे.तसेच दि.३१/१२/२०१८ पूर्वी सन-२०१८ मध्ये बदलीकरिता संचालनालयास सादर केलेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नसल्याची बाब संबंधितांच्या लक्षात आणून द्यावी.

०३.आपल्या संस्थेत कार्यरत असलेल्या अधिकारी /अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांच्या शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकूल आहेत, अशा अधिकारी/अध्यापकांचे नावे सुध्दा कळवून त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत आपले स्पष्ट मत आवश्यक त्या कागदपत्रासहित कळविण्यात यावे.

०४.संस्थाप्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही अधिकारी/अध्यापकांची बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखाकडुन विनंती करण्यात येते. म्हणून याबाबत आपणास सूचित करण्यात येते की, बदली पात्र अधिकारी/अध्यापकांची बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासहित देऊन तशी शिफारस करण्यात यावी.याबाबत बदल्या झाल्यानंतर आपल्याकडून कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही.

०५.बदलीपात्र अधिकारी/अध्यापकांचे पाल्य शैक्षणिक वर्षे २०१९-२० मध्ये १० वी किंवा १२ वीत शिकत असल्याचे कारणास्तव एक वर्षासाठी बदली न करण्याची शिफारस असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करुन त्याबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत पुराव्याकरीता जोडण्यात यावी.

०६.जे बदली पात्र अधिकारी/अध्यापक आहेत,त्यांचे नाव आद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव नमूद करण्यात यावे.**(स्वतःचे नाव,वडिलांचे नाव तद्नंतर आडनाव यानुसार)**

०७.जे बदलीपात्र अधिकारी/अध्यापक नजिकच्या कालावधीत डिसेंबर-२०१९पूर्वी सेवानिवृत होत आहेत,अशा अध्यापकांच्या नावांसमोर ठळक अक्षरात अभिप्राय देण्यात यावा.

०८.जे अधिकारी/अध्यापक बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर प्रचलित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल तसेच सदर बाब गोपनीय अहवालात नमूद करण्यात येईल,ही बाब आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील अधिकारी/अध्यापकांच्या निदर्शनास आणावी.

०९.संदर्भिय अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी व दि.२८/०४/२०१५ च्या विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली-२०१० मधील तरतुदी विचारात घेऊन त्या अनुषंगाने बदल्याची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक व सत्य असल्याचे आपण प्रमाणित करुन घ्यावी.

१०.जे अधिकारी/अध्यापक इतर आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत,त्या सर्व अधिकारी/अध्यापकांची माहिती मूळ आस्थापनेवरुन सादर करावी.

११.दि.२८/०४/२०१५ च्या विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली -२०१० नुसार ज्या अधिकारी/अध्यापकांच्या नियुक्त्या झाल्या आहेत, त्यांच्या नावासमोर <u>#</u> असे चिन्हांकित करावे.दि.०८/०५/२०१५ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन अधिसुचनेनुसार ज्या अधिकारी/अध्यापकांच्या नियुक्त्या १ वर्षांपेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अधिकारी/अध्यापकांच्या नावासमोर <u>#</u> चिन्ह दर्शविण्यात यावे.

१२.एका अध्यापकांच्या माहितीसाठी एकच ओळ(**Row**)वापरावी. **Multipal Lines** मध्ये माहिती देवू नये. (**Alt + Enter** चा वापर करावा.)

१३.ज्या संस्थांमध्ये द्वितीय पाळीची पदे मंजूर आहेत.परंतु,द्वितीय पाळी सुरु नसल्यास द्वितीय पाळीतील पदे दर्शवून तसे स्पष्टपणे नमूद करावे.**(विवरणपत्र-ड)**

**१४.प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यात यावी.**

१५.अध्यापकांची माहिती दर्शविताना सध्या जे ज्या पदावर कार्यरत आहेत, त्या पदावरील रुजू दिनांकापासूनची माहिती प्रपत्र –क मधील रकाना क्र.२१ मध्ये दर्शविण्यात यावी.

१६.आपल्या संस्थेतील नियमित नियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती सोबतच्या **प्रपत्र-क** मध्ये विद्याशाखानिहाय व सेवाज्येष्ठतेनुसार **DD-MMM-YYYY** या तारेख्याच्या **Format** मध्ये तारीख नमूद करताना (-)शिवाय इतर चिन्ह वापरु नये. **(उदा.- 22-Jan-2017)** प्रपत्र अ,ब व क मधील माहिती **Sakal Marathi** या फॉन्ट मध्ये **New Microsoft Excel Worksheet** या नमुन्यातील विहित प्रपत्रात पाठवावी. आपल्या संस्थेतील शिक्षकीय/प्रशासकीय गट-अ व गट-ब संवर्गातील पदांवर कार्यरत असलेल्या अधिका-यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह वरील सूचना विचारात घेऊन तसेच सदर माहिती अचूक या कार्यालयास **Hard Copy** दोन प्रतीत व **Soft Copy** या कार्यालयाच्या **roaurangabad@dtemaharashtra.gov.in** या ई-मेल आयडीवर दि.२१/०१/२०१९ पुर्वी पाठविण्याची कार्यवाही करावी. बदल्याचे प्रस्ताव सादर करताना कोणत्याही प्रकारची चूक होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

सहपत्र :- **वरीलप्रमाणे**

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना त्वरीत संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.

## प्रपत्र अ

# शिक्षकीय / प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा जास्त कालावधी कार्यरत अधिकारी/अध्यापकांच्या प्रशासकीय बदलीसाठीचे विवरणपत्र

## ( प्राचार्य / प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक व प्रशासकीय पदे)

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव | पदनाम | विद्याशाखा | वेतनबँड | एजीपी | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा ((दि.३१.०५.२०१९पर्यंत) | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तीक पसंतीची तीन ठिकाणे | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठीकाण | विनंती बदलीसाठीचे तपशिलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | मान्यवरांची शिफारस | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीच या अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| १ | श्री. अ ब क | सहाय्यक प्राध्यापक | विद्युत अभि | १५६००-३९१०० | ६००० | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शाअम अमरावती | ०१-०८-२०१२ | | ६ वर्ष १० महिने | पुणे नाशिक कराड | पुणे नाशिक कराड | | | | | शाअम औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१० ( ३ वर्षे ८ महिने ) शाअम अवसरी दि ०१-०८-१२ ते आजपर्यत |

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यांत यावी

**सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का**

## प्रपत्र ब

## शिक्षकीय /प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा कमी कालावधी कार्यरत अधिकारी/ अध्यापकांच्या विनंती / मान्यवरांच्या शिफारशीसह माहिती

### ( प्राचार्य / प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक व प्रशासकीय पदे)

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव | पदनाम | विद्याशाखा | वेतनबँड | एजीपी | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा (दि.३१.०५.२०१९पर्यंत) | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठीकाण | विनंती बदलीसाठी चे तपशिलवार कारण व त्याबावतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | मान्यवरांची शिफारस | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्यावावतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीचया अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ | संचालकांचे अभिप्राय | विभागाचा प्रस्ताव | नागरी सेवा मंडळ क्र. १ ची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| १ | श्री. अ व क | सहय्यक प्राध्यापक | विद्युत अभि | १५६००-३९१०० | ६००० | ०१-०१-१९८१ | ३१-१२-२०४० | नामनिर्देशन | ३१-१२-२०१० | शाअम कराड | २८-०८-१६ | | २ वर्षे ९ महिने | पुणे नाशिक नागपूर | वृध्द वडीलांच्या उपचाराकरीता व स्वग्राम असल्याकारणाने | | | | शाअम कराड दि.३१.१२.२०१० ते २७.०८.२०१६, शाअम जळगाव दि.२८.०८.२०१६ ते आजपर्यंत ( २ वर्षे ९ महिने ) | | | |

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्राात देण्यांत यावी

## प्रपत्र क

## संस्थेत कार्यरत सर्व अधिकारी/ अध्यापकांची सविस्तर माहिती

| अनु. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्याशाखा | पे बँड | एजीपी | जन्म तारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार<br>नामनिर्देशन / पदोन्नती | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकुण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी मागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा दि.३१.०५.२०१९पर्यंत) | रकाना क्र. ११ पैकी विनंती वरून अन्यत्र प्रतिनियुक्ती चा कालावधी | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलसाठी पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलीसाठी तपशीलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे | मान्यवरांची शिफारस | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इ. अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ मधील तरतूदींच्या अनुषंगाने संस्थाप्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या विविध पदावर यापूर्वी विविध संस्थेतील संस्था निहाय सेवाकाळ पदनाम / संस्था / कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| १ | श्री. अ ब क | अधिव्याख्याता | स्वयंचल | १५६००-३९१०० | ६००० | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शातंनि उस्मानाबाद | ०१-०८-२०१२ | ६ वर्षे १० महिने | ---- | पुणे कोल्हापूर कराड | पुणे कोल्हापूर कराड | | | | | शातंनि औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१० ( ३ वर्षे ८ महिने )<br>शातंनि उस्मानाबाद दि. ०१-०८-१२ ते आजपर्यत ( दि. ५ वर्षे ९ महिने ) |

सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का

माहिती तयार करताना Sakal Marathi या Font चा वापर करावा अन्य कोणत्याही Font मध्ये माहिती पाठवू नये व माहिती Excel मध्ये सादर करावी.

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यांत यावी

विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांची माहिती अचूक असल्याची खातरजमा करून एकत्रित विभागप्रमुख व अधिव्याख्याता यांची विद्याशाखानिहाय माहिती सादर करावी.
संस्थेकडून आलेली माहिती सादर करू नये.

एका अध्यापकाच्या माहितीसाठी एकच ओळ वापरावी. Multipal Lines मध्ये माहिती देवू नये. (Alt+Enter चा वापर करावा)

अध्यापकांचे संपूर्ण नाव देण्यात यावे

तारीख नमूद करताना DD-MM-YYYY या Format मध्ये नमूद करावी. तारीख नमूद करताना - शिवाय कोणतेही इतर चिन्ह (/, .) वापरू नये

दिनांक ०८-०५-२०१५ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन अधिसुचनेनुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अध्यापकांच्या नावासमोर # चिन्ह दर्शवावे

अध्यापकांची माहिती दर्शविताना सध्या ते ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदावरील रूजू दिनांकापासूनची माहिती प्रपत्र क मधील रकाना क्रमांक २१ मध्ये दर्शवावी

# प्रपत्र – ड

संस्थेचे नाव :

| अ.क्र. | पदनाम व विद्याशाखा | मंजूर | भरलेली | रिक्त | कार्यरत अध्यापकाचे संपूर्ण नाव (अद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव नमूद करावे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यांत यावी

**सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का**